# ज्ञात-अज्ञात - भाग ३

पण आताचा पिक्चर वेगळाच होता. आधीच्या पिक्चरशी त्याचा काहीच संबंध नव्हता. सगळी पात्रं वेगळी होती. मी मुंबईला-गोरेगावला एका अलिशान फ्लॅटमध्ये होते. हे माझे डॉक्टर पती माझ्या सोबत होते आणि तीन महिन्यांची छोटी रिया तोंडाने म म मा मा असे काहीसे आवाज काढत होती. आम्ही दोघं तिला खेळवण्यात पूर्ण रमून गेलो होतो. माझ्या सासूबाईही हे सर्व कौतुकाने पहात सुखावत होत्या. अचानक माझं डोकं एकाएकी खूप दुखायला लागलं. गरगरल्यासारखं वाटायला लागलं. ह्यांनी मला कसलीशी गोळी देऊन बेडरूममध्ये नेऊन झोपवलं. मला खूप रडू फुटलं. हे खोलीत आले. माझ्याजवळ बसून मला थोपटू लागले. ह्यांच्या खांद्यावर मान ठेवून मी ओक्साबोक्शी रडू लागले. ह्यांनी थोडा वेळ मला रडू दिलं. मग जरा शांत करत म्हणाले, ``रियाची भुकेची वेळ झालीय. तिला आणू ना?" मला पान्हा फुटला. मी रियाला पदराखाली घेतलं. पण आता मला रोहन आठवत होता. रोहन - माझा रोहन - माझं बाळ. रियाला पाजत होते, पण डोळ्यासमोर रोहन होता. स्तनातून पाझरणाऱ्या दुधाच्या धारांबरोबर डोळ्यांतून पाझरणाऱ्या अश्रूधारांनी रियाचं जावळ भिजत होतं. मला सगळं आठवत होतं आणि नक्की काय झालं, आता काय करावं काहीच कळत नव्हतं. ह्यांना बहुदा काहीतरी कळलं असावं. हे फोनवर कुणाशीतरी बोलले.

रिया माझ्या कुशीत झोपली. तिला उचलून मी पाळण्यात ठेवलं. हे मला म्हणाले, ``चल, गाडीतून थोडंसं बाहेर जाऊन येऊ. तुला बरं वाटेल." ह्यांनी सासूबाईंना सांगितलं. हे मला घेऊन बाहेर पडले. ह्यांनी गाडी आरेच्या रस्त्याने आत घेतली. छोटा काश्मिरच्या रस्त्याला आम्ही थांबलो. गाडीतच बसलो होतो. हे बोलत होते. त्यांचे शब्द माझ्या कानावर पडत होते, पण मनापर्यंत पोचत नव्हते.

हे म्हणाले, ``तुझ्या बाबांना पहायला, त्यांना भेटायला तू अमेरिकेहून निघाली होतीस. पण मुंबई-पुणे हायवेवर तुझ्या टॅक्सीला ॲक्सिडेंट झाला. टॅक्सी ड्रायव्हर जागच्या जागीच गेला. तुझ्या डोक्याला मार लागून ब्रेन हॅमरेज झाले. पोलिस केस वगैरे सर्व होऊन तुला ससून हॉस्पिटलला ऍडमिट केलं. तुझा पासपोर्ट, त्यावरचा पत्ता, फोन नंबर सर्व शोधून तुझ्या दादाला पोलिसांनी कॉन्टॅक्ट करून सर्व काही सांगितलं. हे सर्व झालं त्याच्या दुसऱ्याच दिवशी बाबा गेले. ते तसे सिरियसच होते. दादा बाबांचे क्रियाविधी करण्यात बिझी होता. म्हणून त्याने हॉस्पिटलमधली तुझी जबाबदारी दोन-चार दिवस मला सांभाळण्यास सांगितलं." हे माझ्या चेहेऱ्यावरचे भाव निरखत होते. ते पुढे म्हणाले, ``तू कोमात गेली होतीस. त्यावेळी पूर्ण तीन महिने तू कोमात होतीस. त्यानंतर शुद्धीवर आलीस. पण तुला तुझ्या

आयुष्यातला मधला तीन वर्षांचा काळ - ते काहीच आठवत नव्हतं. रादर तू यू एसला जाऊन मास्टर्स केलं आहेस हे काहीच तुला आठवत नव्हतं. तू कोमात असताना तुझ्या तिकडच्या ऑफिसमध्ये फोन करून दादाने सर्व परिस्थिती सांगितली. तेव्हा त्यांनी निनाद तांबे म्हणून कुणाला तरी कळवलं. त्यांनी तुझ्या दादाला फोन करून तुमचं लग्न झाल्याची आणि तुला तीन महिन्याचा छोटा मुलगा असल्याची गोष्ट सांगितली. तू कधीच हे काही बोलली नव्हतीस. त्यामुळे नक्की खरं काय कळायला मार्ग नव्हता. मात्र आठवडाभराने तुझ्या छोट्याला घेऊन निनाद तांबे इंडियाला पुण्याला आले होते.'' ``मग? त्यांनी मला इथेच सोडलं? मला नेलं नाही बरोबर?'' माझ्या डोक्याचा पार भुगा झाला होता. मेंदू बधीर झाला होता. मी डोकं गच्च दाबून बसले हेते. ``नाही तसं नाही. ते खरंच अगदी सद्गृहस्थ आहेत. पण तू त्यांना अजिबात ओळखू शकत नव्हतीस. तुझी स्मृती गेलेली असल्यामुळे हे सर्व झालं. तुला आम्ही हॉस्पिटलमधून तसंच पाठवू शकत नव्हतो. निनादचे आईवडीलही येऊन तुला भेटून गेले. त्यांना तर हे सर्व जबरदस्त शॉकच होता. तू केव्हा बरी होशील, तुझी स्मृती केव्हा परत येईल, येईल का येणारच नाही... डॉक्टरही काहीच सांगू शकत नव्हते. शेवटी तुझ्या छोट्या मुलाला-रोहनला घेऊन निनाद तांबे अमेरिकेला परत गेले. एक-दोन महिने त्यांचे दादाला कधीतरी फोन येत. पण इथली तुझी परिस्थिती जैसे थेच होती. मग मात्र त्यांनी फोन करणं थांबवलं. त्यानंतर त्यांचा कॉन्टॅक्ट नाही. हं, आणि अजून एक, तुझ्या आईला मात्र आम्ही अजूनपर्यंत काहीही सांगितलेलं नाही. बाबांच्या अशा अचानक जाण्याने आणि तुझ्या भयंकर ॲक्सिडेंटने त्या पार कोलमडून गेल्या होत्या. त्यांची मानसिक अवस्था बघता निनाद, रोहन हे सर्व त्यांच्यापासून गुप्त ठेवणंच श्रेयस्कर असं आम्ही ठरवलं.''

``पण मग तुम्ही, आपलं लग्न... रिया...'' ``सांगतो ना!'' हे म्हणाले. ``तीन महिन्यानंतर तू कोमातून बाहेर आलीस. त्यावेळी तुला पूर्वीचं सारं आठवत होतं. तुझा दादा आणि मी मित्र. बरेचदा तुझ्या-माझ्या लग्नाचा विषय आडून आडून दोन्ही घरी निघायचा. तू एम.एस. करून आल्यावर तुझ्याही मनात असेल तर बघू असं मी म्हणत असे. आणि हॉस्पिटलमध्ये तुझी सेवा करता करता मी पुन्हा नव्याने तुझ्या प्रेमात पडलो होतो. तू बरी झाल्यावर आपल्या दोघांच्या आयांनी आपल्या पाठी लग्नाचा तगादा लावला. तू सहजपणे हो म्हणालीस. मला जरा आश्चर्यच वाटलं होतं. पण तुझ्यावर प्रेमही होतंच. त्यामुळे मधला तीन वर्षांचा काळ विसरून मी तुझ्याशी लग्न करण्याचा प्रस्ताव मान्य केला. आपलं लग्न झालं. मी मुद्दामच मुंबईच्या हॉस्पिटलची नोकरी घेतली, आणि तुझ्यासह नव्या आयुष्याला सुरवात केली. आपल्या लग्नानंतर लगेचच तू प्रेग्नंट राहिलीस. आणि ही रिया झाली. तू खूष होतीस. फक्त कधीतरी तुझं डोकं दुखतं म्हणायचीस. अशावेळी तुला एक झोपेची गोळी देऊन मी झोपू देत असे. बाकी तुझी कधीच काही तक्रार नव्हती. पण आता असली तर सांग. बंदा हाजीर है।''

ह्यांनी इतक्या प्रेमाने माझ्याकडे पाहिलं आणि मी पार विरघळून गेले. ह्यांचा सच्चेपणा माझ्या मनाला भिडला. त्यांच्या चांगुलपणावर, भलेपणावर मी त्या दिवशी मला आठवलेला माझा तो मधला तीन वर्षांचा काळ पूर्ण अंधारात ढकलला. अगदी निग्रहाने. हा एवढा काळ मधे लोटला, आता निनाद आणि रोहनची आठवण काढण्यात, पत्ता लावण्यात काहीच अर्थ नव्हता. माझ्या डोळ्यांसमोर रिया होती. छोटी-तीन महिन्यांची. माझं बाळ. माझ्या पहिल्या बाळाला - रोहनला असाच तीन महिन्यांचा सोडून मी इकडे आलो होते. आईविना माझं ते बाळ कसं वाढलं मला माहीत नाही. पण आता पुन्हा माझ्या तेवढ्याच छोट्या रियाला सोडून मला कुठे जायचं नव्हतं. रिया माझं सर्वस्व होती. मी माझा मधला भूतकाळ मनाच्या कप्प्यात पार बंद करून ठेवला आणि अपार विश्वासाने ह्यांच्या खांद्यावर डोकं ठेवलं.

आम्ही दोघं घरी आलो. त्या रात्री त्यांनी मला झोपेचं इंजेक्शन देऊनच झोपवलं. नंतर एक-दोन दिवसांनी माझ्या बऱ्याच काही टेस्ट वगैरे केल्या. मी पूर्ण नॉर्मल होते. खरं तर तसं मनाशी पक्क ठरवूनच वागत होते. हे आणि रिया हेच माझं आता विश्व होतं.

हळूहळू रिया मोठी होत होती. १२ वी नंतर चांगले मार्क्स असूनही तिला बाबांसारखं डॉक्टर न होता इंजिनियर व्हायचं होतं. व्होकेशनल घेऊन ती कम्प्यूटर इंजिनियर झाली. तिला शाळेपासूच त्यात इंटरेस्ट असलेला जाणवत होतं. आणि त्यानंतर त्यात मास्टर्स करायला ती यूएसला गेली होती.

रियाने एम एस पूर्ण केलं. तिला तिकडच्या युनिव्हर्सिटीची पदवी मिळणार होती. त्या तिच्या पदवीदान समारंभासाठी खास आम्ही दोघांनी जायचं ठरवलं होतं. माझं मन अभिमानाने भरून आलं. रिया-माझी रिया... रिया प्रेमात पडलीय. ती प्रेमात पडलीय रॅनच्या. आणि त्या रॅनबद्दल मला जाणून घ्यायचंय म्हणून मी आधी चाललेय अमेरिकेला. हे मागाहून महिन्याभरानंतर येणार आहेत. रिया आणि रॅन. नावावरून जोडी तर छान जमलीय असं वाटतंय. कशी असेल रियाची निवड? कसा असेल रॅन? इंटरव्हलनंतरचा पिक्चर - गतकाळातल्या आठवणींचा मन:पटलावरचा पिक्चर पूर्ण होत आला तशी माझ्याही डोळ्यात नीज दाटली.

जाग आली तेव्हा विमान लॅन्ड व्हायला फक्त अर्धा तास शिल्लक होता. घाईने उठून टॉयलेट, ब्रश करून मी फ्रेश होऊन सीटवर बसले. घड्याळ तिकडच्या वेळेप्रमाणे ॲडजस्ट केलं. छान कडक कॉफी आणि बिस्किट्स खाल्ली. खूप फ्रेश वाटत होतं. दोन वर्षानंतर लेक भेटणार होती. सीट बेल्ट लावून सर्वजण प्लेनच्या लॅन्डिंगच्या प्रतिक्षेत होतो.

प्लेन लॅन्ड झालं. हॅन्डबॅग, पर्स घेऊन मी विमानातून बाहेर आले. दीर्घ श्वास घेतला. तीस वर्षांपूर्वी ह्याच विमानतळावरून मी इंडियाला यायला प्रयाण केलं होतं. खूप काही मागे ठेवून. माझं सर्वस्व... त्या वेळी नियतीच्या मनात काय आहे ह्याची जरासुद्धा कल्पना नसलेली मी... पण आज त्या मनाच्या लॉकरमधल्या आठवणी पुन्हा लॉक करून नव्या उत्साहाने पण धडधडत्या अंतकरणाने ह्या देशात पाहुणी म्हणून मी आले होते.

लगेज कलेक्ट करून इमिग्रेशनच्या लाईनमधून मी बाहेर पडले. समोरच रिया आणि तिच्यासोबत तिचा मित्र - ज्याच्या ती प्रेमात पडलीय, ज्याच्याशी ती लग्न करायचं म्हणाली तो रॅन... ओ गॉड!

माझ्या पायाखालची जमीन सरकतेय की काय असा भास मला झाला. सगळं गरगर फिरतंय असं वाटलं. शांत सागरात अचानक मोठ्ठा भोवरा उठल्याप्रमाणे... काय होतंय मला... हा रॅन? रियासोबत तिच्या हातात हात गुंफून उभा असलेला हाच का तो रॅन? हा तर अगदी हुबेहूब निनादसारखाच दिसतोय. हा प्रतिनिनाद माझ्या लेकीचा हात धरून माझी वाट पहात उभा आहे. नक्की हा रॅनच आहे का? आणि जर हाच रॅन असेल तर दैव माझी इतकी क्रूर थट्टा का बरं करतंय? इतक्या वर्षानंतर, नियतीने पुन्हा आता माझ्या पुढ्यात काय वाढून ठेवलंय?

विचारांच्या चक्रव्यूहात अडकत मी सामानासह एक एक पाऊल पुढे पुढे चालले होते. चक्रव्यूहात शिरायला. चक्रव्यूहाचा भेद करायला. अभिमन्यूसारखं चक्रव्यूहाच्या आत शिरण्याचा - रियापर्यंत जाण्याचा मार्ग माझ्यासमोर होता. पण तो भेदण्याचा मार्ग मला माहीत नव्हता. आणि तरीही माझी पावलं आपोआप पुढेपुढेच पडत होती.

बाहेर आल्याबरोबर, मला भेटल्याबरोबर रिया माझ्या मिठीत शिरली. पण रॅन पटकन पायाशी वाकला. त्यालाही मिठीत घ्यावं अशी उर्मी अचानक दाटून आली. मी स्वत:ला आवरलं. रियाने त्याची ओळख करून दिली. ``मम्मा, हा रॅन. रॅन टी. खरं म्हणजे त्याचं नाव आहे रोहन तांबे." पुढचे शब्द माझ्या मनाला झिणझिणून गेले. जाणीवेनेणीवे पलीकडे. मनाच्या गाभाऱ्यायात खोल कुठेतरी कळ उठत होती.

रॅनच्या कारमधून आम्ही तिघं रियाच्या रूमकडे निघालो. रस्ताभर रिया आणि रॅन माझ्याशी बरंच काही बोलत होते. माझ्या बधिरल्या मनाला असंख्य इंगळ्या डसत होत्या. रिया सांगत होती -

``रॅनची आई तो अगदी तान्हा असतानाच त्याला आणि त्याच्या डॅडला सोडून गेली होती. त्याच्या डॅडने रॅनला सांभाळलं, मोठं केलं. रॅनचा डॅड मागच्या वर्षी कॅन्सरने गेला."

रॅन म्हणजे रोहन आहे. तो माझा मुलगा आहे. माझ्या पहिल्या प्रेमाचं प्रतिक! आणि रिया माझी मुलगी. माझ्या हक्काच्या नवऱ्याची आणि माझी मुलगी. माझा प्राण. पण म्हणजे रॅन आणि रिया एकमेकांचे बहीण भाऊ आहेत. पण हे काहीच माहीत नसलेली ती दोघं एकमेकांच्या प्रेमात पडलीयत. लग्न करणार आहेत. काय करावं? हे कसं थांबवावं? माझं डोकं सुन्न झालं होतं. बधीर झालं होतं. गोठलेल्या मनाने मी जडशीळ झालेलं डोकं सीटच्या बॅकरेस्टवर टेकवलं.

(क्रमश:)

**लीना माटे**